फळबाग

# संत्रा बागांचे पुनरुज्जीवन



प्रा. पी.एस घुले
प्रा. डी.व्ही. मोरे
प्रा. संदीप विधाते
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक





भारी जमिनीमध्ये केलेली लागवड, अन्नद्रव्यांची कमतरता, अयोग्य ओलीत व्यवस्थापन, मशागतीचा अभाव आणि बुरशीजन्य रोगाचा (फायटोप्थोरा) प्रादुर्भाव इत्यादींमुळे काही ठिकाणी संत्रा बागा खालावलेल्या किंवा ऱ्हास होण्याच्या स्थितीत आहेत. योग्य उपायांद्वारे त्यांचे पुनरुज्जीवन केल्यास या बागा वाचवता येतील.

सध्या अस्तित्त्वात असलेल्या संत्रा बागांपैकी फारच कमी बागा शास्त्रीय पद्धतीने तयार केलेल्या आढळतात. संत्रा बागेचे खते व पाणी तसेच किडी-रोगांच्या नियंत्रणाचे व्यवस्थापन फारच कमी बागायतदार करतात. त्याला अनेक कारणे असली तरी तांत्रिक माहितीचा अभाव हे एक प्रमुख कारण आहे. यामुळे बहुतांश संत्र्याच्या बागांचा ऱ्हास हा अपेक्षित उत्पादन देण्यापूर्वीच झालेला पहावयास मिळतो. लागवडीसाठी अयोग्य जमिनीची व कलमांची निवड, ओलितासाठी पाण्याची कमतरता, भारतीय दृष्टिकोनातून खतांचे, पाण्याचे व किडींचे व्यवस्थापन करण्याचा अभाव, मृगबहार येण्यासाठी वाजवीपेक्षा जास्त ताण देण्याची प्रवृत्ती, झाडावरील रोगट-वाळलेल्या फांद्या, साल न काढण्याची वृत्ती, पाणी व खते देण्याची चुकीची पद्धत, बागेच्या सुरुवातीच्या काळात ज्वारी, कपाशी इत्यादींसाठी आंतरपीक घेण्याची शेतकऱ्यांची प्रवृत्ती इत्यादी कारणांमुळे संत्र्याच्या झाडापासून अपेक्षित असलेले चांगल्या प्रतीचे उत्पादन मिळत नाही व बागेचा अल्पावधीत ऱ्हास होतो.



**संत्रा बागेच्या नुकसानीची कारणे**

भारी जमिनीमध्ये केलेली लागवड, अन्नद्रव्यांची कमतरता, अयोग्य ओलीत व्यवस्थापन, मशागतीचा अभाव आणि बुरशीजन्य रोगाचा (फायटोप्थोरा) प्रादुर्भाव इत्यादींमुळे काही ठिकाणी संत्रा बागा खालावलेल्या किंवा ऱ्हास होण्याच्या स्थितीत आहेत. योग्य उपायांद्वारे त्यांचे पुनरुज्जीवन केल्यास या बागा वाचवता येतील.

**प्रतिबंधात्मक उपाय**

१. अयोग्य, भारी, खोल, पाण्याचा योग्य निचरा न होणाऱ्या जमिनीत लागवड करू नये.

२. ताण देण्याचा कालावधी हा जमिनीच्या मगदुरानुसार व झाडाच्या क्षमतेनुसारच असावा. अतिरिक्त ताण देऊ नये.

३. रंगपूर किंवा जंबेरी खुंटावरील कलमे निवडावीत.

४. ओलिताच्या पाण्याचा खोडाशी होणारा संपर्क टाळावा.

५. आळ्यामध्ये पाणी साचू देऊ नये अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याकरिता उताराच्या दिशेने चर काढावे.

६. शिफारशीनुसार एकात्मिक पद्धतीने अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे.

७. कीड व रोगांचे वेळीच नियंत्रण करावे.

८. झाडाच्या वयानुसार व ताकदीनुसार झाडावर फळांची संख्या ७०० ते ९०० राखावी. झाडाच्या शक्तीपेक्षा जास्त फळधारणा झाल्यास सल येण्याचे प्रमाण वाढते.

**जुन्या बागेचे पुनरुज्जीवन करण्याकरिता उपाय**

**छाटणी** : जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात (पाऊस सुरु होण्यापूर्वी) झाडावरील सर्व वाळलेल्या व रोगट फांद्या ओल्या (हिरव्या) भागापासून १ इंच अंतरापासून छाटून टाकाव्यात. मध्यम व मोठ्या फांद्या आरीने छाटाव्यात तसेच हिरव्या फांद्या सुद्धा शेंड्यापासून ४५ सें.मी. लांब अंतरावर छाटाव्यात.

**बोर्डो मलम लावणे** : छाट दिलेल्या भागावर बोर्डो मलम (१:१:१०) लावावे. तसेच झाडाच्या मुख्य खोडास (बुंधा) बोर्डो मलम लावावे. कीटक व बुरशीनाशकाची फवारणी करावी.

**खत व्यवस्थापन** : छाटणीनंतर प्रत्येक झाडास ५० किलो शेणखत + ७.५ किलो निंबोळी ढेप झाडाच्या घेराखाली मातीत मिसळून द्यावे. ऑक्टोबर महिन्यात ५०० ग्रॅम नत्र + ५०० ग्रॅम स्फुरद द्यावे.

**ओलीत व्यवस्थापन** : झाडाच्या गरजेपुरते ओलीत करावे. ओलिताकरिता दुहेरी आळे पद्धतीचा अवलंब करावा तसेच ठिबक सिंचन पद्धतीने ओलीत केल्यास ३० टक्के पाण्यात बचत होऊन उत्पादन उत्तम प्रतीचे मिळते.

**छाटणीचे फायदे**

१. संत्रा झाडावर जोमदार फांद्यांची वाढ होते. पानांचा आकार मोठा होतो आणि पानाचा रंग गर्द हिरवा होऊन चकाकी येते.

२. संत्र्यांची फळे मोठ्या आकाराची व उत्तम प्रतीची तसेच पातळ सालाची, घट्ट, बत्तीदार, चमकदार आणि एकसारख्या आकाराची मिळतात. या फळांना बाजारात भरपूर भाव मिळतो.

३. प्रत्येक झाडावर साधारणतः ७०० ते १२०० पर्यंत फळे येतात.



४. फांद्या व झाडाला बांबूंचा आधार देण्याची गरज नसते. तसेच फळधारणा योग्य प्रमाणात होत असल्यामुळे फांद्या तुटण्याची भीती नसते.

५. छाटणी केलेल्या झाडाला दरवर्षी बहार नियमित येतो.

६. झाडाचे आयुष्यमान ५ ते ७ वर्षांनी वाढते आणि अधिक उत्पादन मिळते.

७. संत्रा झाड सशक्त, जोमदार, निरोगी व दीर्घायुषी बनते.

**छाटणीकरिता लक्षात ठेवण्याच्या आवश्यक बाबी**

१. संत्रा झाडाची छाटणी एकदाच जून महिन्यात करावी, छाटणी दरवर्षी करू नये.

२. छाटणी केल्यानंतर पहिल्या वर्षी मृग आणि आंबिया बहार येतो.

३. छाटणी केलेल्या संत्रा बागेची निगा शिफारस केल्याप्रमाणे खत व्यवस्थापन, ओलीत व्यवस्थापन आणि किडी व रोगांच्या नियंत्रणाद्वारे राखावी.

४. छाटणी ही वयस्क १८ ते २० वर्षे वयाच्या झाडांचीच करावी. तरुण संत्रा झाडांची छाटणी करू नये.

**सलाटलेल्या बागांचे पुनरुजीवन करण्याकरिता उपाय**

१. वाळत असलेल्या संत्रा झाडाच्या हिरव्या फांद्या ३० ते ४५ सें.मी. शेंड्यापासून सिकेटरच्या साहाय्याने छाटाव्यात.

२. वाळलेल्या फांद्यांचा हिरवा भाग २ ते ३ सें.मी. घेऊन छाटावा. छाटणी करताना प्रत्येक वेळी सिकेटर कार्बेंडॅझिमच्या द्रावणात बुडवावी.

३. छाटणी केल्यानंतर लगेच १ लिटर पाण्यात १ ग्रॅम कार्बेंडॅझिम टाकून फवारणी करावी. मोठ्या फांद्या छाटल्या असतील तर त्या ठिकाणी त्वरित बोर्डोपेस्ट लावावी.

४. संत्रा झाडाचा संपूर्ण वाफा खोदून मुळ्या उघड्या कराव्यात व सडलेल्या मुळ्या काढून टाकाव्यात आणि वाफा ५ ते ७ दिवस उघडा ठेवावा.

५. एक लिटर पाण्यात २ ग्रॅम मेटॅलेक्झिल एम.झेड. किंवा फोसिटिल एल. टाकून त्याचे १० ते २० लिटर द्रावण झाडाच्या वयानुसार खोदलेल्या वाफ्यात टाकावे. प्रतिझाडास ५० किलो शेणखत + ७.५ किलो निंबोळी ढेप + १ किलो अमोनियम सल्फेट द्यावे.

६. १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १/२ किलो म्युरेट ऑफ पोटॅशचे मिश्रण टाकावे व खोदलेले वाफे मातीने चांगले झाकावेत. सेंद्रिय खतासोबत ट्रायकोडर्मा व्हर्जिएनम + ट्रायकोडर्मा व्हॅरिडी + सुडोमोनोस फ्लोरोसन्स १०० ग्रॅम प्रतिझाड टाकावे.

७. १५ दिवसांनी पुन्हा ०.६ टक्के बोर्डो मिश्रणाचे (६:६:१००) २० लिटर द्रावण वाफ्यात शिंपडावे.

८. या बोर्डो मिश्रणाची झाडावरसुद्धा फवारणी करावी.

९. झाडाच्या बुंध्याला १ मीटर उंचीपर्यंत बोर्डो मलम लावावे.

१०. साल खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणाकरिता झाडावरील अळीने खाल्लेला भाग साफ करून छिद्रात तार टाकून छिद्रे मोकळी केल्यानंतर त्या छिद्रात पिचकारीच्या साहाय्याने केरोसिन किंवा पेट्रोल किंवा कीटकनाशक द्रावण सोडावे व छिद्रे ओल्या मातीने बंद करावीत. ■